**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** नेवासा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1020 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/12/2025 04:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date From (दिनांक पासून):** 04/12/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/12/2025

**Time From (वेळेपासून):** 18:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/12/2025 **Time (वेळ):** 04:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/12/2025 04:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 07 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जीओ पेट्रोल पंपासमोर, हंडीनिमगाव,नेवासा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राहुलकुमार धनाजी नाईक
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,सरकार वाडा,नाशिक शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,सरकार वाडा,नाशिक शहर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7972210736

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजयभानसिंग गुलाबसिंग परदेशी | | | 1. भानुदय बंगला,जनरल आरुन वैद्य ,जामखेड नाका नगर जामखेड रोड,भिंगार अहिल्यानगर,अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम रुपये 1,50,000 | 150,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

150,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद नेवासा पोलीस ठाणे,अहिल्यानगर
दिनांक:- 05/12/2025

मी राहुलकुमार धनाजी नाईक, वय 50 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक. सरकारतर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक या कार्यालयात सुमारे 4 महिन्यापासुन कार्यरत आहे.

मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी आम्ही दिनांक 02/12/2025 रोजी आमचे कक्षात हजर असतांना त्यांचे कक्षात बोलवुन एका तक्रारदाराकडे एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असुन त्यांचेशी संपर्क करुन पुढील कार्यवाही करणेबाबत आदेशीत करुन तक्रारदार यांचा मोबाईल क्रमांक दिला. त्यानुसार आम्ही तक्रारदार यांना संपर्क करुन त्यांचे नाव व तक्रारीबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.महेश हरिभाऊ खाटीक असे सांगुन त्यांचेकडे एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असुन दिनांक 03/12/2025 रोजी नेवासा येथे येण्यास सांगितले व त्यानंतर ते पुढील तक्रार देणार असल्याबाबत सांगितले.

त्यानंतर आम्ही मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास भवन नाशिक यांना त्यांचेकडील दोन कर्मचारी दिनांक 03/12/2025 रोजी सकाळी 07/00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात उपलब्ध करुन देणे बाबत दिनांक 02/12/2025 रोजी पत्र दिले. त्याप्रमाणे दि.3/12/2025 रोजी 07/00 वाजता अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचेकडील 1)धनंजय सुनिल वाटाणे, वयः 45 वर्षे, व्यवसाय-नोकरी, शिपाई, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक रा. बंगला क्र.570,कोयना लक्ष्मी कॉलनी, शिवाजी नगर, जेलरोड, नाशिकरोड, नाशिक,2)श्री.राहुल गोकुळ सांगोरे, वय -39 वर्षे, व्यवसाय- नोकरी, मुख्यलिपीक, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक. रा. 23, धर्मात्मा को.ऑप.हौसींग सोसायटी, विशाल पार्क, कामटवाडे, सिडको, नाशिक असे पंच लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नाशिक येथे आमचे कक्षात उपस्थित झाले. तेव्हा आम्ही दोन्ही पंचाना आमची व सापळा पथकाची यांची ओळख करुन देवून तक्रारदार श्री.महेश खाटीक, रा. नेवासा यांचेकडे लोकसेवक लाचेची मागणी करीत असुन त्यांची तक्रार ऐकुन, तक्रार नोंदवुन त्याप्रमाणे पुढील कारवाई करणेकरिता आपणांस नेवासा येथे जायचे असलेबाबत सांगितले.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील पोहवा/माळी, पोहवा/निकम असे चापोहवा/विनोद पवार यांचेकडील शासकीय वाहन क्र. एम.एच. 15 जे.एस. 3092 ने सापळा कारवाईकामी लागणाऱ्या साहित्यासह दिनांक 3/12/2025 रोजी 07/30 वाजेच्या सुमारास नेवासा येथे रवाना झालो, प्रवासादरम्यान तक्रारदार यांचेशी फोनवरुन झालेल्या संभाषणानुसार नेवासा-खटका फाटा रोडवरील रस्त्याचे बाजुला मोकळ्या जागी पोहचलो ती वेळा साधारण 10/15 वाजेची होती. तेथे आमचे वाहनाजवळ एक इसम येवुन आपण अँन्टी करप्शन ब्युरो,नाशिक येथुन आलात काय ? बाबत विचारणा केली. तेव्हा आम्ही होय असे सांगितले. त्यानंतर त्यांनी सांगितले की, ''माझेशीच आपले फोनवर बोलणे झाले असुन मी तक्रारदार श्री.महेश खाटीक आहे.'' असे सांगितले. त्यावेळी आम्ही चापोहवा/पवार यांना वाहनातुन उतरुन बाजुला थांबण्यास सांगितले व तक्रारदार यांना वाहनात बसवुन घेवुन तक्रारदार श्री.खाटीक यांना आमची, दोन्ही पंचाची व सापळा पथकातील सदस्यांची आपआपसात ओळख करुन दिली.

त्यावेळी तक्रारदार श्री.महेश हरिभाऊ खाटीक, वय 36 वर्षे, व्यवसाय- शेती व वकीली, रा. पाथरवाला ता.नेवासा जि.अहिल्यानगर यांनी तक्रार दिली तिचा सारांश पुढीलप्रमाणे.

तक्रारदार यांचा भाऊ नामे श्री.ज्ञानेश्वर हरीचंद/हरीभाऊ खाटीक यांचे नावे त्यांचे गावी पाथरवाला-गोयगव्हाण या शिवारात गट नंबर 31 व गट नं. 313 हे वडील नामे हरीचंद्र/हरीभाऊ खाटीक यांचे नावे शेती आहे. तरी सदर शेतीमधुन जाणे-येणेकरिता शीव रस्तावर अतिक्रमण असल्याने तक्रारदार यांचे भाऊ/वडील व इतर शेतकरी यांनी सदरचा शीव रस्ता खुला करण्यासंदर्भात मा.तहसिलदार यांच्याकडे दिनांक 31/1/2022 मध्ये अर्ज केला होता. त्यावर मा. तहसिलदार यांनी मोजणी करीता येणारा खर्च अर्जदार शेतकरी यांनी स्वतः भरणा करून मोजणी करून घ्यावी असा आदेश पारित केला होता. सदर आदेशा विरूध्द तक्रारदार यांचे भाऊ व इतर शेतकरी यांनी मा. उच्च न्यायालयात 4527/2022 नुसार रिटपिटीशन दाखल केले त्यावर मा.उच्च न्यायालयाने शीव रस्ता खुला करण्याकरीता मोजणीसाठी येणारा खर्च अर्जदार यांच्याकडुन न घेता शासनाने करावा असे आदेश दिले होते.

त्यानंतर सदरचा शीव रस्ता मोजणी करून फेब्रुवारी 2023 मध्ये सर्वा करीता खुला करण्यात आला. त्यानंतर रस्त्याचे मजबुती करणाचे काम मार्च 2025 मध्ये मंजुर झाले. त्यावेळी गट नं.30 तसेच पाथरवाल्यातील काही शेतकऱ्यानी पुन्हा मोजणी करावयाची असलेबाबत उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, नेवासा येथे अर्ज करुन मोजणी फी भरली.

दिनांक 6/6/2025 रोजी मोजणी अधिकारी श्री.जयदिप गाढे यांनी गटाची मोजणी केली. त्यावेळी तक्रारदार व त्यांचे भाऊ तेथे उपस्थित होते. तक्रारदार व्यवसायाने वकील असल्याने त्यांचे उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय येथे जाणे-येणे असल्याने श्री.गाढे यांची व त्यांची तोंड ओळख होती. तसेच सदरची शेतजमीन ही तक्रारदार यांचे कुटुंबियांची असल्याची त्यांना माहिती होती. त्यामुळे मोजणीच्या वेळी श्री.गाढे यांनी तक्रारदार यांना सांगितले की, तुम्ही जर पंचवीस हजार रूपये नाही दिले, तर गट नं. 30 ची हद्द शिव रस्त्याचे मधोमध दाखवेल. परंतु पहिली मोजणी उच्च न्यायालयाचे आदेशाने झालेली असल्याने तक्रारदार यांनी त्यावेळी त्यांना पैसे दिले नाहीत व त्यांनी सदरच्या खुणा रस्त्यामध्ये दाखवल्या.

त्यानंतर तक्रारदाराच्या भावाने दिनांक 30/06/2025 रोजी पुन्हा भुमिअभिलेख कार्यालय, नेवासा, येथे मोजणी संदर्भात तक्रारी अर्ज केला व सदर तक्रार अर्जाचे अनुशंगाने उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, येथे तक्रारदार यांचे भावास वेळोवेळी जाणे शक्य नसल्याने त्यानी तक्रारदार यांना तेथे अर्जाचा पाठपुरावा करणेबाबत सांगितले होते. त्यामुळे तक्रारदार हे त्यांचे भावाने केलेल्या तक्रार अर्जाचे अनुशंगाने उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय येथे चैकशी करीता अधुनमधुन जात होते.

तक्रारदार हे ऑक्टोबर 2025 च्या शेवटच्या आठवडयात उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय येथे गेले. त्यावेळी श्री.जयदिप गाढे यांनी तक्रारदार यांना सांगितले की, जर तक्रारदार यांनी दोन लाख रुपये त्यांना दिले तरच ते उच्च न्यायालयाचे आदेशानंतर जी मोजणी झाली, त्यानुसार आताची मोजणी दाखवतील अन्यथा पुर्वीच्या मोजणीत बदल करणार नाही, त्यावेळी तेथे श्री.गाढे यांचेसोबत परदेशी देखील होते. तेव्हा श्री.गाढे यांनी यापुढे याबाबत जे काही बोलायचे आहे ते परदेषी यांचेशी बोलण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार हे त्याचवेळी परदेषी यांचेसोबत बोलले असता त्यांनी तक्रारदार यांना मोजणीचे काम झाल्यावर दिड लाख रुपये त्यांचेकडे आणुन द्या, असे सांगितले. तक्रारदार यांचे शेताचा रस्ता बंद असल्याने त्यांनी नाईलाजाने सदर रक्कम देण्यास होकार दिला.

उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, नेवासा यांनी दिलेल्या आदेशानुसार श्री.गाढे यांनी दिनांक 28/11/2025 रोजी सदर शिव रस्त्याची व गटाची मोजणी करून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ज्या खुणा दाखवल्या होत्या त्या प्रमाणे दाखविल्या व रस्ता खुला केला.

त्यानंतर दि. 29/11/2025 रोजी श्री. परदेशी यांचेशी मोबाईलवर संपर्क झाला त्यावेळी त्यांनी सदरची मोजणी ही पुन्हा मा. उच्च न्यायालयाच्या मोजणी नुसार करून दिल्याच्या मोबदल्यात श्री.गाढे यांच्या करीता तक्रारदार यांचेकडे दिड लाख रुपयेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचेकडे आता पैसे नाही व सोने तारण करून पैसे आणुन देतो, असे सांगितले होते.

तरी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर झालेल्या मोजणी नुसार शीव रस्त्याची पुर्ववत मोजणी करून हद्द करुन दिल्याच्या मोबदल्यात श्री. परदेशी हे श्री. गाढे यांच्याकरीता तक्रारदार यांचेकडे दिड लाख रुपये लाचेची मागणी करीत असुन सदरची रक्कम ही लाचेची असल्याबाबत तक्रारदार यांची खात्री झाली व त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.

तक्रारदार व श्री. परदेशी, श्री. गाढे यांच्यात कोणतेही आर्थिक हितसंबंध नसुन पुर्व वैमनस्य नाही.

तक्रारदार हे दि.3/12/2025 रोजी शीव रस्त्या मोजणी केलेल्या अहवालाची प्रत मागण्याकरिता उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, नेवासा येथे श्री. परदेशी यांचेकडे जाणार आहे. त्यावेळी श्री. परदेशी अथवा गाढे यांनी

तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करणेबाबत विनंती केली व त्यासोबत तक्रारदार यांचे भाऊ ज्ञानेश्वर हरीचंद्र खाटीक यांनी दि. 30/6/2025 रोजी उपअधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, नेवासा येथे दिलेल्या अर्जाची छायांकित प्रत तसेच सदर अर्जाचे अनुशंगाने उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय येथील कामकाज करण्याकरिता दिलेले अधिकारपत्राची प्रत सादर केली.

सदर तक्रार आम्ही व दोन्ही पंचानी वाचली असुन त्यावर तक्रारदार यांची व समक्ष म्हणुन आम्ही व दोन्ही पंचाच्या सहया आहेत.

तक्रारदार यांनी वरील प्रमाणे तक्रार दिल्याने त्यांचे तक्रारीप्रमाणे पाथरवाला -गोयगव्हाण शिवारातील शेतीमधुन जाणाऱ्या शीव रस्त्याची मा.उच्च न्यायालयाकडील मोजणीनुसार पुर्ववत मोजणी करुन दिल्याच्या मोबदल्यात उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, नेवासा येथील श्री.परदेशी हे श्री.गाढे यांचेकरिता लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करण्यासाठी तक्रारदार श्री.खाटीक व त्यांचेसोबत पंच नं. 1 म्हणुन श्री. धनंजय वाटाणे यांना पाठविण्याचे ठरले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 श्री. वाटाणे यांना योग्य त्या सुचना देवुन पोहवा/माळी यांना व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते तक्रारदार यांचे शर्टच्या आत बनियनला उजव्या बाजुस सेफ्टी पिनने लावुन तक्रारदार श्री.खाटीक व पंच नं. 1 श्री.वाटाणे यांना तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहन क्र. एम.एच.17 सी.ई. 253 ने नेवासा-खडका फाटा रोडवरील जय बालाजी कोल डेपोच्या बाजुला असलेल्या मोकळया जागेतुन रवाना केले. ती वेळ साधारण 11/29 वाजेची होती. त्यानंतर आम्ही सदर ठिकाणी शासकीय वाहनात थांबुन राहिलो.

काही वेळाने तक्रारदार व पंच आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ साधारण 12/17 वाजेची होती. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोहवा/माळी यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. तेव्हा आम्ही पंच नं. 1 श्री. वाटाणे व तक्रारदार यांना रवाना केलेपासुनची हकीगत विचारली. त्यावेळी तक्रारदार श्री. खाटीक यांनी सांगितले की, ते व पंच असे उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय येथे गेले. त्यावेळी तेथे लोकसेवक श्री. गाढे व लोकसेवक परदेशी हे कार्यालयात नसल्याने तसेच लाचेच्या संदर्भात लोकसेवक परदेशी हेच त्यांचेसोबत बोलत असल्याने फक्त त्यांनाच फोनव्दारे संपर्क केला असुन लोकसेवक परदेशी हे दुपारी दिड-दोन वाजता कार्यालयात येणार असल्याचे व त्यावेळी लोकसेवक परदेशी हे फोन करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले त्यावेळी लोकसेवक परदेशी कार्यालयात दुपारी येणार असल्याची व फोन करणार असल्याची आमची खात्री झाली.

त्यानंतर दुपारी 15/30 वाजेपावेतो लोकसेवक परदेशी यांचा फोन न आल्याने तसेच तक्रारदार श्री.खाटीक यांनी लोकसेवक परदेशी हे कार्यालयात आले असतील म्हणुन त्यांना कार्यालयात जावुन भेटावे लागेल असे सांगितल्याने आम्ही पुन्हा पोहवा/माळी यांना व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते तक्रारदार श्री.खाटीक यांचेकडे देवुन तक्रारदार व पंच नं.1 श्री. वाटाणे यांना लोकसेवक परदेशी यांचे भेटीकरिता उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय येथे रवाना केले. ती वेळ साधारण 16/01 वाजेची होती.

काही वेळाने तक्रारदार व पंच आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ साधारण 16:29 वाजेची होती. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोहवा/माळी यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. तेव्हा आम्ही पंच नं. 1 श्री.वाटाणे व तक्रारदार यांना रवाना केलेपासुनची हकीगत विचारली. तेव्हा पंच व तक्रारदार यांनी सांगितले की, आपण आम्हाला लोकसेवक परदेशी यांचे भेटीकरिता रवाना केले, त्यावेळी लोकसेवक परदेशी यांची भेट झाली व तक्रारदार श्री.खाटीक यांनी त्यांचे कामाचे अनुशंगाने चर्चा केली, परंतु त्यावेळी लोकसेवक परदेशी हे म्हटले की, ''इथे नको, इथं चर्चा होते, संध्याकाळी फोन करतो'' असे लोकसेवक परदेशी यांनी सांगितल्याचे तक्रारदार श्री.खाटील व पंच श्री.वाटाणे यांनी सांगितले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले ते तक्रारदार श्री.खाटीक व पंच श्री.वाटाणे यांनी सांगितल्याप्रमाणेच असल्याची आमची खात्री झाली.

काही वेळाने लोकसेवक परदेशी यांचा तक्रारदार श्री.खाटीक यांना फोन आला व लोकसेवक परदेशी यांनी तक्रारदार यांना भेटण्याकरिता बोलविले, त्यावेळी तक्रारदार श्री. खाटीक यांनी लोकसेवक परदेशी यांना नेवासा कोर्टा समोर असलेल्या तक्रारदार यांचे ऑफीसमध्ये येण्याबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही पुन्हा पोहवा/माळी यांना व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते तक्रारदार श्री. खाटीक यांचेकडे देवुन त्यांना व पंच श्री. वाटाणे यांना तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहनाने लोकसेवक परदेशी यांचे भेटीकरिता रवाना केले. ती वेळ साधारण 17/25 वाजेची होती.

काही वेळाने तक्रारदार श्री. खाटीक व पंच श्री. वाटाणे हे आम्ही थांबलेल्या नेवासा-खटका फाटा रोडवरील जय बालाजी कोल डेपोच्या बाजुला असलेल्या मोकळया जागी परत आले. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोहवा/माळी यांनी तक्रारदर यांचेकडुन व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. ती वेळ साधारण 17/51 वाजेचे दरम्यान होती. त्यावेळी आम्ही पंच नं. 1 श्री. वाटाणे याना तक्रारदार यांचेसोबत लोकसेवक श्री. परदेशी यांचे भेटीकरिता रवाना

केले पासुन घडलेल्या घटनेविशयी विचारले असता त्यांनी पुढीलप्रमाणे हकीगत सांगितली.
पंच क्र. 1 हे तक्रारदार यांचेसोबत त्यांचे नेवासा न्यायालयासमोरील कार्यालयात गेले व तेथे काही वेळाने तक्रारदार यांना लोकसेवक परदेशी यांचा फोन आला असता तक्रारदार यांनी सदरचा फोन स्पिकर मोडवर केला, त्यावेळी लोकसेवक परदेशी यांनी तक्रारदार यांना ऑफीसच्या खालीच या, असे सांगितल्याने पंच व तक्रारदार त्यांचे ऑफीसमधुन खाली कोर्टाच्या बाजुस असलेल्या रोडलगत लावलेल्या चारचाकी वाहनाजवळ गेले. तेव्हा तक्रारदार यांनी पंच यांना हाताचे इशाऱ्याने गाडीच्या बाजुला थांबण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार हे सदर गाडीत बसले त्यावेळी गाडीच्या ड्रायव्हर सिटवर लोकसेवक परदेशी हे बसलेले पंचाने पाहिले. तक्रारदार हे गाडीत बसल्यानंतर गाडीच्या काचा या बंद असल्याने त्यांचेतील संभाशण पंचास ऐकु आले नाही. परंतु दिवसभरात लोकसेवक परदेशी यांचे भेटीदरम्यान लोकसेवक परदेशी व तक्रारदार श्री. खाटीक यांचेत झालेल्या संभाशणानुसार ते तक्रारदार यांचे कामाचे अनुशंगाने चर्चा करीत असल्याचे त्यांचे हावभावावरुन दिसुन आले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. खाटीक यांना हकीगत विचारली असता त्यांनी पंच श्री. वाटाणे यांनी सांगितल्याप्रमाणे हकीकत सांगितली व ते लोकसेवक परदेशी यांचे गाडीत बसल्यानंतर लोकसेवक परदेशी यांचेसोबत कामासंदर्भाने चर्चा झाली. तक्रारदार यांनी काही तरी कमी करा असे सांगितले, त्यावेळी परदेशी म्हटले की,"दोन सांगितले होते, त्यानंतर दिडवर आपले फाईनल झाले होत, त्यात नई बदल व्हायला पाहिजे." असे सांगुन तक्रारदार श्री.खाटीक यांचेकडे दिड लाख रुपये लाचेची मागणी केली.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडुन ताब्यात घेतलेले व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व लोकसेवक परदेशी यांचेत रेकॉर्ड झालेले संभाशण आम्ही, दोन्ही पंचानी व सापळा पथकाने ऐकले असता त्यातील संभाशणावरुन लोकसेवक परदेशी यांनी पाथरवाला-गोयगव्हाण शिवारातील शेतीमधुन जाणाऱ्या शीव रस्त्याची मा.उच्च न्यायालयाकडील मोजणीनुसार पुर्ववत मोजणी करुन दिल्याच्या मोबदल्यात तक्रारदार श्री. खाटीक यांचेकडे बक्षीस म्हणुन दिड लाख रुपये लाचेची मागणी करीत असल्याची सर्वांची खात्री झाली. परंतु तक्रारदार श्री. खाटीक यांनी लोकसेवक यांना लाचेची रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असल्याने लोकसेवक परदेशी यांनी त्याचेत बदल करण योग्य नाही असे बोलुन मी तुम्हाला सांगतो, असे सांगितले. तसेच तक्रारदार यांना पैशाची जमवाजमव करण्यास वेळ लागणार असल्याने सदरची सापळा कारवाई ही उद्ईक रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले.
त्यानंतर आम्ही सापळा पथकासह अहिल्यानगर रोडवरील 24×7 फुड मॉल येथील हॉटेलवर जावुन तेथील दोन रुम भाडेतत्वावर घेतले. त्यावेळी सदर रुममध्ये जावुन आम्ही आमचेकडील व्हॉईस रेकॉर्डर पोहवा/निकम यांचेकडे देवुन तक्रारदार श्री.खाटीक व लोकसेवक परदेशी यांच्यात पडताळणी कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आलेल्या तीन फाईलची हॅषव्हॅल्यु काढण्यास सांगुन रेकॉर्ड झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार करण्यास सांगितली. त्याप्रमाणे पोहवा/निकम यांनी कामकाज केले. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा हा 24×7 फुड मॉल येथील हॉटेलमधील रुममध्ये लॅपटॉपवर आम्ही सांगितल्याप्रमाणे पोहवा/माळी यांनी टंकलिखीत केला आहे.
त्यानंतर तक्रारदार श्री.खाटीक यांना दिलेल्या सुचनांप्रमाणे दि.4/12/2025 रोजी तक्रारदार हे 15/00 वाजेचे सुमारास 24×7 फुड मॉल येथील हॉटेलमधील रुममध्ये आमचे समक्ष आले. त्यावेळी त्यांनी लोकसेवक परदेशी यांना लाच म्हणुन देण्याकरिता लाचेची रक्कम रुपये 1,50,000/-त्यात 500/-रुपये दराच्या 300 चलनी नोटा सोबत आणल्या होत्या, सदर नोटांचे क्रमांक आमचे सुचनेवरुन पोहवा/निकम यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केले. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोहवा/निकम यांनी लाचेच्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले.
त्यानंतर तक्रारदार यांचे मित्र नामे प्रविण संतोश साळवे यांनी तक्रारदार यांना फोन करुन लोकसेवक परदेशी यांनी त्यांना फोन करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार श्री.खाटीक यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9763926315 वरुन लोकसेवक परदेशी यांचे मोबाईल क्र. 9326024365 वर संपर्क करुन मोबाईलचा स्पिकर ऑन केला ती वेळ साधारण 18/14 वाजेची होती. त्यावेळी लोकसेवक परदेशी यांनी तक्रारदार यांना अहिल्यानगर-औरंगाबाद रोड येथील जिओ पेट्रोल पंपाचे समोर बोलविले असल्याने आमचे सुचनेवरुन पोहवा/निकम यांनी तक्रारदार श्री.खाटीक यांचे पॅन्टच्या पुढील दोन्ही बाजुचे खिशात अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटा ठेवुन त्यांना व पंच नं. 1 श्री.वाटाणे यांना लोकसेवक परदेशी यांचे भेटीकरिता तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहन क्र. एम.एच.12 एच.व्ही.9436 ने अहिल्यानगर रोडवरील 24×7 फुड मॉल हॉटेलचे पार्कींग मधुन रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही आमचेकडील शासकीय वाहनाने लाचेच्या सापळा कारवाई करणेकामी रवाना झालो.
त्यावेळी तक्रारदार श्री.खाटील यांनी त्यांचेकडील चारचाकी वाहन नेवासा येथील अहिल्यानगर -छत्रपती संभाजी नगर रोडवरील जिओ पेट्रोल पंपासमोर येथे थांबविले व त्यानंतर ते व पंच श्री.वाटाणे तक्रारदार यांचे वाहनाचे मागे उभे असलेल्या टाटा कंपनीचे इलेक्ट्रिक वाहन क्र. एम.एच.16 डी.एस. 8365 जवळ गेले त्यावेळी पंच नं 1 श्री.

वाटाणे हे सदर वाहनाजवळ थांबले. व तक्रारदार श्री.खाटीक हे सदर वाहनात जावुन बसले त्यानंतर काळी वेळाने तक्रारदार यांनी लोकसेवक परदेशी यांचे चारचाकी वाहनाचे पार्कींग लाईट सुरु करुन लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केल्याने लोकसेवक परदेशी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.
त्यानंतर पोहवा/माळी यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच श्री.वाटाणे यांना लाचेची रक्कम कोणी घेतली याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, लोकसेवक परदेशी यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रुपये 1,50,000/-पॅन्टच्या दोन्ही खिशातुन लाचेची रक्कम काढुन लोकसेवक परदेशी यांचेसमोर धरली असता त्यांनी सदरची रक्कम डाव्या हाताने स्विकारुन ती वाहनातील हॅन्ड ब्रेक येथील मोकळया जागी ठेवली.
त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीत लोकसेवक परदेशी हे लोकसेवक गाढे यांचेकरिता लाच मागत असल्याची तक्रार दिली असल्याने सदर लाचेच्या रक्कमेत लोकसेवक गाढे यांचा सहभाग आहे अगर कसे ? याची खात्री करणेकरिता आम्ही लोकसेवक परदेशी यांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांचे मोबाईलवरुन लोकसेवक गाढे यांना संपर्क करण्यास सांगितले, व त्यानुसार त्यांनी श्री.गाढे यांना संपर्क करुन मोबाईलचा स्पिकर ऑन केला व त्यांना सांगितले की, ''खाटीक यांची भेट झाली असुन त्यांनी दिड लाख रुपये दिले आहे, त्याचे काय करायचे?'' यावर श्री.गाढे यांनी काय करायच ते तुम्ही ठरवा हे सांगुन या विशयावर उद्या बोलुया असे सांगुन फोन कट केला तरी सदरचे संभाशण हे मेमरीकार्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात आले आहे.
सदर कारवाईबाबत सविस्तर यशस्वी सापळा कारवाई पंचनामा करण्यात आला आहे.
तरी यातील आरोपी लोकसेवक अजयभान सिंग गुलाबसिंग परदेशी, वय 48 वर्शे, व्यवसाय-नोकरी,भुकरमापक,वर्ग 3,नेम. उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, नेवासा जि. अहिल्यानगर यांनी दिनांक 03/12/2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री.खाटीक यांचे तक्रारीप्रमाणे पाथरवाला-गोयगव्हाण शिवारातील शेतीमधुन जाणाऱ्या शीव रस्त्याची मा.उच्च न्यायालयाकडील मोजणीनुसार पुर्ववत मोजणी करुन दिल्याच्या मोबदल्यात भुकरमापक श्री.जयदिप गाढे यांचेकरिता रक्कम रुपये 1,50,000/-लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि. 04/12/2025 रोजी 18/35 वाजेचे दरम्यान नेवासा येथील अहिल्यानगर -छत्रपती संभाजीनगर रोडवरील जिओ पेट्रोल पंपाच्या समोर लोकसेवक यांचे चारचाकी वाहनात स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले.
अशा प्रकारे लोकसेवक अजयभान सिंग गुलाबसिंग परदेशी, वय 48 वर्षे, व्यवसाय-नोकरी,भुकरमापक, वर्ग 3,नेम. उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, नेवासा जि. अहिल्यानगर यांनी आपल्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेण्याचे हेतुने, कायदेशीर परिश्रमीका खेरीज अन्य पारितोषण म्हणुन बेकायदेशीर मार्गाने बक्षीस म्हणुन 1,50,000/-रुपयेची लाच स्विकारुन आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेतला म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 अ प्रमाणे गुन्हा केला आहे, म्हणून माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली
दि. 05/12/2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Mahesh Vishnu Patil(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पो.हे.कॉ.-2129 एस.डी.राठोड
पोलीस ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Mahesh Vishnu Pat
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI